जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 05-02-2020

तरुण भारत

# यंदा पदवीधरांमध्ये मुलींची बाजी...

## मुलींचा ५५ टक्के सहभाग : पदवीधरांच्या आकडेवारीत यंदा १२ हजारने वाढ

**आशिष आडिवरेकर**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ गुरुवारी साजरा होत आहे. यंदा ६० हजार १६७ स्नातकांना पदवीचे वितरण करण्यात येणार आहे. गेल्या दोन वर्षापेक्षा यंदा तब्बल १२ हजार पदवीधारकांची संख्या वाढली असल्याचे चित्र आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे. पदवीधरांच्या संख्येमध्ये मुलींची संख्या ५५ टक्यावर पोहोचली असून तुलनेत मुलांची संख्या केवळ ४५ टक्क्यांवर आहे. यंदाच्या ६० हजार १६७ स्नातकांमध्ये ३२ हजार ४६६ मुलींचा समावेश आहे.

'चूल आणि मूल' या संकल्पनेत अडकलेल्या महिलांना शिक्षण मिळविण्यासाठी त्या काळी सावित्रीबाई फुले यांना समाजाची कुचेष्टा, अहवेलना सहन करावी लागली. मोठा संघर्ष करत त्यांनी मुलींच्या शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. परिणामी मुलींच्या शिक्षणाची दारे खुली झाली. आता मोठ्या आत्मविश्वासनो मुली पदवी, उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण घेत आहेत. सर्वच क्षेत्रात आपली कर्तबगारी सिद्ध करत आहेत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला सर्वच क्षेत्रात वाटचाल करत आहेत.

शिक्षणामध्ये मुलींनी पुरूषांना मागे टाकत यंदा बाजी मारली आहे. यंदा पदवी प्राप्त करण्यामध्येही मुलींची संख्या वाढली आहे. यंदा एकूण ६० हजार १६७ स्नातकांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येणार आहे. यामध्ये ३२ हजार ४६६ मुली, तर २७ हजार ७०१ मुलांचा सहभाग आहे. मुलींची आकडेवारी जवळपास ५५ टक्क्यांवर पोहोचली आहे. दिवसेंदिवस या आकडेवारीमध्ये भरच पडत आहे. विज्ञान, वाणिज्य, कला यासह व्यावसायिक अभ्यासक्रम, मॅनेजमेंट यासह सर्वच शाखांमध्ये शिक्षण घेण्यामध्ये मुली अग्रेसर आहे.



**पदवीधरांची संख्या**

| वर्ष | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| २०१७ | २४०२३ | २५९२८ | ४९९५१ |
| २०१८ | २३५०६ | २६९३८ | ५०४४४ |
| २०१९ | २२३८९ | २६१२६ | ४८५१५ |
| २०२० | २७७०१ | ३२४६६ | ६०१६७ |

**मुलींचा टक्का वाढला**

| वर्ष | प्रत्यक्ष | बाय पोस्ट | महाविद्यालयात | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०१७ | ११२७५ | १४६५३ | – | २५९२८ |
| २०१८ | १२७०३ | १४२३५ | – | २६९३८ |
| २०१९ | १२८७० | १३२५६ | – | २६१२६ |
| २०२० | ११५४ | १२१९० | १९१२२ | ३२४६६ |

### तरुणांचा उच्च शिक्षणाकडे ओढा



सरकारने शिक्षणासाठी राबविलेली सर्वसमावेशक धोरणे विद्यापीठाने योग्य पद्धतीने राबविली आहेत. विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला कौशल्य, संशोधन, व्यवस्थापन, तंत्रज्ञान याची जोड देऊन एक व्यासपीठ शिवाजी विद्यापीठाने निर्माण करुन दिले आहे. यामुळेच कोल्हापूर जिल्ह्यातील तरुणांचा उच्च शिक्षणाकडे ओढा वाढला आहे. यामध्ये मुलींची संख्या लक्षणीय असल्याचे चित्र पदवी प्रमाणपत्र वितरण आकडेवारीवरुन दिसून येत आहे.

**डॉ. देवानंद शिंदे,**
**कुलगुरु शिवाजी विद्यापीठ**

# राष्ट्रमाता जिजाऊ यांच्यामुळे शिवछत्रपतींसारखा युगपुरुष लाभला

## वसंतराव मुळीक; राष्ट्रमाता जिजाऊ, शिवरायांचे तैलचित्र विद्यापीठाकडे सुपूर्द

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांचे संस्कार व प्रेरणा यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्य स्थापन करू शकले. माँ साहेबांच्या मार्गदर्शनामुळेच देशाला शिवछत्रपतींसारखा युगपुरुष लाभला. त्यामुळे दोघांचे माहात्म्य अधोरेखित करणारे तैलचित्र शिवाजी विद्यापीठाला प्रदान करताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, असे उद्‍गार अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक यांनी काढले.

अखिल भारतीय मराठा महासंघ व शिवभक्त लोकआंदोलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात लावण्यासाठी राजमाता जिजाऊ व शिवराय यांची चित्रकृती मंगळवारी सकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. 'शिवरायांची कीर्ती सांगे, आईच माझा गुरू' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित ही चित्रकृती आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ चित्रकार जे. बी. सुतार यांच्याकडून वसंतराव मुळीक व इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी करून घेतली आहे. सुमारे १५ वर्षांपूर्वी रेखाटलेल्या तैलचित्राचा आकार भव्य आहे.



**कोल्हापूर : छत्रपती शिवराय व राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांचे तैलचित्र कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना वसंतराव मुळीक, इंद्रजित सावंत आदी. (छाया : तय्यब अली)**

यावेळी मुळीक म्हणाले, तैलचित्राच्या हजारो प्रती घरोघरी पोहोचविण्यात आल्या आहेत. ही अद्वितीय चित्रकृती तिच्या लौकिकाला साजेशा योग्य ठिकाणी लावली जावी.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठासाठी हा आनंद व अभिमानाचा चिरस्मरणीय क्षण आहे. राष्ट्रमाता जिजाऊंनी शिवरायांना त्यांच्या वाटचालीमध्ये सातत्याने योग्य दिग्दर्शन केले. शिवरायांच्या जडणघडणीत त्यांचा किती मोलाचा वाटा आहे, हे दर्शविणारे हे अप्रतिम तैलचित्र आहे. तैलचित्राला राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात लावून योग्य तो सन्मान केला जाईल.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. गिरीष कुलकर्णी यांच्यासह इतिहास अभ्यासक गणेश नेर्लेकर-देसाई, शशिकांत पाटील, शंकरराव शेळके, शैलजा भोसले, प्रकाश पाटील, प्रताप नाईक, इंद्रजित माने, अवधूत पाटील, कृष्णाजी हरुगडे, गुरुदास जाधव उपस्थित होते.

# शिवरायांची कीर्ती सांगे, आईच माझा गुरू...!

## जिजाऊ व शिवरायांचे तैलचित्र विद्यापीठास सुपूर्द



कोल्हापूर : अखिल भारतीय मराठा महासंघ व शिवभक्त लोकआंदोलन समितीतर्फे शिवाजी विद्यापीठाला मंगळवारी जिजाऊ आणि शिवरायांचे भव्य तैलचित्र सुपूर्द केले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, वसंतराव मुळीक, इंद्रजित सावंत आदी.

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ४ : राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांचे संस्कार आणि प्रेरणा यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्य स्थापन करू शकले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच या देशाला शिवछत्रपतींसारखा युगपुरुष लाभला. त्यामुळे या दोघांचेही महात्म्य अधोरेखित करणारे तैलचित्र शिवाजी विद्यापीठाला प्रदान करताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, अशी भावना भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक यांनी व्यक्त केली.**

मराठा महासंघ आणि शिवभक्त लोकआंदोलन समितीच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात (दीक्षान्त सभागृह) लावण्यासाठी ही कलाकृती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द केली. त्यावेळी ते बोलत होते.

इतिहास संशोधक इंद्रजित सावंत म्हणाले, ''विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी छत्रपतींचा मूळ इतिहास सांगणारी विविध कागदपत्रे जगासमोर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे ही चित्रकृती शिवाजी विद्यापीठात असण्याला एक वेगळे औचित्य व महत्त्व आहे.''

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आभार व्यक्त करताना तैलचित्राला राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात लावून योग्य तो सन्मान केला जाईल, अशी ग्वाही दिली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. गिरीष कुलकर्णी यांच्यासह इतिहास संशोधक गणेश नेर्लेकर-देसाई, शशिकांत पाटील, शंकरराव शेळके, शैलजा भोसले, प्रकाश पाटील, प्रताप नाईक, इंद्रजीत माने, अवधूत पाटील, शरद साळुंखे, कृष्णाजी हरगुडे, गुरुदास जाधव आदी उपस्थित होते.

### भव्य तैलचित्र...

'शिवरायांची कीर्ती सांगे, आईच माझा गुरू' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित असणारी ही कलाकृती आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ चित्रकार जे. बी. सुतार यांच्याकडून श्री. मुळीक व इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी तयार करून घेतली आहे. पंधरा वर्षांपूर्वी रेखाटलेल्या या तैलचित्राचा आकार आठ बाय दहा फूट इतका भव्य आहे.



छत्रपती शिवराय आणि राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांचे तैलचित्र कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना वसंतराव मुळीक, इंद्रजित सावंत यांच्यासह अन्य मान्यवर.

# जिजाऊ, शिवरायांचे तैलचित्र विद्यापीठाकडे सुपूर्द

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

अखिल भारतीय मराठा महासंघ आणि शिवभक्त लोकआंदोलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात (दीक्षान्त सभागृह) लावण्यासाठी राजमाता जिजाऊ आणि शिवराय यांची तैलरंगातील चित्रकृती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. 'शिवरायांची कीर्ती सांगे, आईच माझा गुरू', या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित असणारी ही चित्रकृती आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ चित्रकार जे. बी. सुतार यांच्या कुंचल्यातून साकारली आहे. या तैलचित्राचा आकार आठ फूट बाय दहा फूट इतका भव्य आहे.

यावेळी मराठा महासंघाचे अध्यक्ष वसंतराव मुळीक म्हणाले की, ही अद्वितिय चित्रकृती तिच्या लौकिकाला साजेशा योग्य ठिकाणी लावली जावी, या भावनेतून शिवाजी विद्यापीठाकडे ती सुपूर्द करण्यात आली आहे. इंद्रजित सावंत म्हणाले, 'विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी छत्रपतींचा मूळ इतिहास सांगणारी विविध कागदपत्रे जगासमोर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे ही चित्रकृती शिवाजी विद्यापीठात असण्याला एक वेगळे औचित्य व महत्त्व आहे.'

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले की, या तैलचित्राला राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात लावून योग्य तो सन्मान केला जाईल.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. गिरीष कुलकर्णी यांच्यासह इतिहास संशोधक गणेश नेर्लेकर-देसाई, शशिकांत पाटील, गुरुदास जाधव आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात लावण्यासाठी अखिल भारतीय मराठा महासंघाकडून 'शिवरायांची कीर्ती सांगे, आईच माझा गुरु' हे तैलचित्र कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी वसंतराव मुळीक, इंद्रजित सावंत, डी. टी. शिर्के, गणेश नेर्लेकर, आदी उपस्थित होते.

# विद्यापीठास जिजाऊ, शिवरायांचे तैलचित्र सुपूर्द

## मराठा महासंघाचा पुढाकार : बहुउद्देशीय सभागृहात लागली चित्रकृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राष्ट्रमाता जिजाऊ यांचे संस्कार आणि प्रेरणा यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्य स्थापन करु शकले. त्यामुळे या दोघांचेही माहात्म्य अधोरेखित करणारे तैलचित्र शिवाजी विद्यापीठाला प्रदान करताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठा महासंघाचे उपाध्यक्ष वसंतराव मुळीक यांनी मंगळवारी केले.

मराठा महासंघ आणि शिवभक्त लोकआंदोलन समिती यांच्यातर्फे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात (दीक्षान्त सभागृह) लावण्यासाठी म्हणून राजमाता जिजाऊ आणि शिवराय यांची चित्रकृती सकाळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. दुपारनंतर हे तैलचित्र या सभागृहात लावण्यात आले. ही चित्रकृती आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ चित्रकार जे. बी. सुतार यांच्याकडून वसंतराव मुळीक आणि इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी विशेषत्वाने करवून घेतली आहे. तैलचित्राचा आकार ८ बाय १० फूट आहे. या कार्यक्रमास प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, इंद्रजित सावंत, डॉ. रत्नाकर पंडित, प्रल्हाद माने, गिरीश कुलकर्णी, इतिहास संशोधक गणेश नेर्लेकर, शशिकांत पाटील, शंकरराव शेळके, शैलजा भोसले, प्रकाश पाटील, प्रताप नाईक, इंद्रजित माने, अवधूत पाटील, शरद साळुंखे, आदी उपस्थित होते.

अमित गद्रे



## झळाळी...

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ उद्या, गुरुवारी होणार आहे. यानिमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी सायंकाळी विद्यापीठाची इमारत उजळून गेली.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 05-02-2020

तरूण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ गुरुवारी आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आल्याने परिसर उजळून निघाला आहे. (छाया. रियाज ट्रेनर)

# विद्यापीठ उजळले...



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभानिमित्त विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारत व अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : तय्यब अली)



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वार्षिक दीक्षांत समारंभ गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. यावेळी विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष भूषण पटवर्धन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीस करण्यात आलेल्या विद्युत रोशणाईमुळे विद्यापीठ परिसर उजळून निघाला आहे. (छाया : पांडुरंग पाटील)

अमित गद्रे



मुख्य मिरवणूक मार्गावर मंडप उभारणी अंतिम टप्प्यात आली आहे.



राजमाता जिजाऊ सभामंडपासमोर कमान उभारण्यात आली आहे.



प्रत्यक्ष पदवी स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरणासाठी उभारण्यात आलेले कक्ष.

# दीक्षान्त समारंभाच्या तयारीला वेग

विद्यापीठाच्या प्रांगणात उच्चशिक्षणातील पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा क्षण हा विद्यार्थीकाळातील अभिमानाचा. ६ फेब्रुवारीला शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ होत आहे. आज, ५ फेब्रुवारी रोजी ग्रंथमहोत्सवाने या कार्यक्रमाचे बिगुल वाजणार आहे. यानिमित्ताने विद्यापीठ आवारातून दीक्षान्त सभामंडपाकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर मंडप उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. प्रत्यक्ष पदवी स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमानुसार पदवी प्रमाणपत्र देणारे कक्ष उभारण्यात येत आहेत. दीक्षान्त सभामंडपासमोर कमान उभारण्याचे काम शेवटच्या टप्प्यात आहे. मंगळवारी सायंकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सर्व तयारीचा आढावा घेतला.

# 'दीक्षान्त'ची तयारी अंतिम टप्प्यात



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या गुरुवारी होणाऱ्या दीक्षान्त सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर मुख्य इमारत मंगळवारी रात्रीपासून विद्युत रोषणाईने उजळून निघाली. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त सोहळा गुरुवारी (ता. ६) होणार असून त्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई केली असून 'केएमटी' उपक्रमामार्फत विशेष बस सेवा दिली जाणार आहे.

दीक्षान्त समारंभासाठी शुगरमिल व शिवाजी चौक येथून नियमित बसेस सकाळी ६.३० वा. पासून सुरू राहणार आहेत. या बससेवेचा मार्ग छ. शिवाजी महाराज चौक-सायन्स कॉलेज-विनायक बंगला-रेल्वे फाटक-राजारामपुरी-सम्राटनगर/ सायबर-विद्यापीठ असा राहील. सेवेसाठी प्रवाशांना शिवाजी चौक ते विद्यापीठ (आवार) असा १२.०० रुपये दर असेल. त्याचप्रमाणे साळोखेनगर - आपटेनगर-कागल-कणेरी मठ बसेस शिवाजी विद्यापीठ मार्गे धावतील. याशिवाय बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रेल्वे फाटक नं. १ येथून सकाळी ७.०० वा. पासून प्रत्येक १० मिनिटांच्या अंतराने जाण्यासाठी विशेष बस सेवा सुरु राहील.

# दीक्षान्त समारंभाचे आज ग्रंथ महोत्सवाने उद्घाटन

## प्रशासनाकडून जय्यत तयारी; मुख्य इमारतीला रोषणाई



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभानिमित्त उभारलेला मंडप.
(छाया : तय्यब अली)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ गुरुवारी (दि. ६) सकाळी १०.४५ वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठात समारंभाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. समारंभाचे औचित्य साधून बुधवारी सकाळी ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.

विद्यापीठात दीक्षान्त सभा मंडप उभारला असून ग्रंथ महोत्सवासाठी स्टॉल लावले आहेत. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह सजविण्याचे काम सुरू आहे. विविध विभागांत रंगरंगोटीचे काम पूर्ण झाले आहे. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीस आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. परिसरात पार्किंगची व्यवस्थाही केली आहे. परीक्षा विभागाच्या वतीने प्रमाणपत्र वाटपासाठी परीक्षा विभाग परिसरात स्टॉल लावले आहेत.

दीक्षान्त समारंभानिमित्त 'ग्रंथ महोत्सव-२०२०' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. बुधवारी (दि. ५) सकाळी दहा वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहाजवळ ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. भारतीय व परदेशी कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डिजिटल ग्रंथ आदीचे ३० स्टॉल लावण्यात येणार आहेत. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने 'गीत बहार' हा सांस्कृतिक कार्यक्रम



**शिवाजी विद्यापीठातून...**

सादर केला जाणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. नमिता खोत यांनी दिली.

**केएमटीची विशेष बससेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभासाठी के.एम.टी. उपक्रमामार्फत विशेष बससेवा देण्यात येणार आहे. शुगरमिल व शिवाजी चौक येथून नियमित बसेस सकाळी ६.३० पासून सुरू राहणार आहेत. बस सेवेचा मार्ग छ. शिवाजी महाराज चौक, सायन्स कॉलेज, विनायक बंगला, रेल्वे फाटक, राजारामपुरी, सम्राटनगर/सायबर, शिवाजी विद्यापीठ असा राहील. प्रवाशांना शिवाजी चौक ते विद्यापीठ (आवार) असा १२ रुपये दर आकारण्यात येईल.

त्याचप्रमाणे साळोखेनगर-आपटेनगर-कागल-कणेरी मठ या बसेस शिवाजी विद्यापीठ मार्गे धावतील. याशिवाय, बाहेर गावांहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रेल्वे फाटक नं. १ येथून सकाळी ७ वाजल्यापासून प्रत्येक दहा मिनिटांच्या अंतराने शिवाजी विद्यापीठ येथे जाण्यासाठी विशेष बस सेवा सुरू राहील. बस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Dt. 05-02-2020

Times of India

# More girls to be conferred degrees in this yr's convocation

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The 56th th convocation ceremony of the Shivaji University, Kolhapur (SUK) on Thursday will see girl students as top degree drawers. With 32,466 degrees, female graduates are topping the charts among total 60,167 graduates, revealed SUK data.

According to varsity officials, this is the highest number of degrees they are conferring this year.

Among the graduates, science and technology stream graduates are top degree drawers with 29,236 degrees who will receive degree certificates this year. A report from the SUK said that students from humanities faculty are the next with 14,645 degrees, followed by commerce stream with 14,640 degrees.

An official from the varsity said that the as many as 60,167 degrees will be conferred this year. Of the total degrees, 2,065 will be conferred in the university while 35,668 will be conferred in respective colleges. Around 22,434 degrees will be conferred via postal mode. In addition, as many as 353 PhD scholars too will be awarded their degrees during the event.

File photo



For this year's convocation ceremony, Maharashtra governor and chancellor Bhagat Singh Koshyari will preside over the function while Dr Bhushan Patwardhan, vice-chairperson University Grants Commission (UGC) will be the chief guest.

During the main event, Abhishek Shriram from the department of English, SUK, will be conferred with the coveted president's medal for his overall excellence in sports, cultural activities, academics and community services during the academic year 2019-20. Kirti Nanavare from Satara will be awarded chancellor's award for securing highest marks in MA in Sanskrit.

**An official from the varsity said that as many as 60,167 degrees will be conferred this year. Of the total degrees, 2,065 will be conferred at the SUK while 35,668 will be conferred in respective colleges. Around 22,434 degrees will be conferred via postal mode**

It has to be noted that the SUK started functioning in 1962 with 34 affiliated colleges and about 14,000 students with five post-graduate departments on the campus. Today, the number of affiliated colleges has gone up to 282 and student strength up to three lakh with 40 postgraduate departments on campus. The varsity imparts education in 10 major faculties of arts, social science, science, sommerce, education, fine arts, law, and engineering and technology.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि: 05-02-2020

तरुण भारत

# विद्यापीठात आजपासून ग्रंथमहोत्सवास प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभाचे औचित्य साधून १४ व्या ग्रंथमहोत्सवाचे आयोजन शिवाजी विद्यापीठामध्ये करण्यात आले आहे. बुधवार व गुरुवार दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथमहोत्सवामध्ये देश विदेशातील पुस्तकांचा खजिना वाचकांसाठी खुला करण्यात येणार आहे. अशी माहिती ग्रंथमहोत्सवाच्या समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बुधवार (५) रोजी सकाळी १०



वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर ११. ३० वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने गीतबहार या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७. ३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन करण्यात येणार आहे. जनता बझार, राजरामपुरी मेन रोड, आईचा पुतळा, सायबर चौक मार्गे शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृह येथे ग्रंथदिंडीचे विसर्जन होणार आहे. ग्रंथमहोत्सवामध्ये देश विदेशातील पुस्तकांचा खजिना वाचकांसाठी खुला करण्यात येणार आहे. या महोत्सवामध्ये पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ, उपहारगृह इत्यादिंचे ३० स्टॉल उभारण्यात येणार आहेत.

# दीक्षांत समारंभात खादीचा प्रचार

## 'युजीसी'च्या सूचनेनुसार आवाहन : पांढरा कुर्ता, मोती रंगाची साडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) सूचनेनुसार शिवाजी विद्यापीठाकडून ५६ व्या दीक्षांत समारंभात गुरुवारी खादीचा प्रचार आणि प्रसार केला जाणार आहे. त्याबाबतचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतला आहे. त्यानुसार या समारंभाला येताना शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी खादीचे कपडे परिधान करुन यावेत, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात आले आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठाचे अधिकारी, विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध अधिकार मंडळांचे पुरुष सदस्य हे पांढऱ्या रंगाचा खादीचा कुर्ता अथवा कमीझ किंवा जोधपुरी, जॅकेट तर महिला या मोती रंगाची साडी अथवा सलवार कुर्ता परिधान करुन येणार आहेत. केशरी रंगाचे मानवस्त्र त्यांच्या गळ्यामध्ये असणार आहे. या मानवस्त्रावर विद्यापीठाचे बोधचिन्ह आणि नाव असणार आहे. पहिल्यांदाच अशा पद्धतीचा पेहराव करण्यात येणार आहे. पदवी प्रदान करण्यासाठी परीक्षा भवनसमोर विद्याशाखानिहाय दहा स्टॉल उभारण्यात आले आहेत. महाविद्यालयांना त्यांच्या विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे ही दूरशिक्षण केंद्रामध्ये वितरीत केली जाणार आहे. समारंभाची तयारी विविध समित्यांच्या माध्यमातून सुरु असून, ती अंतिम टप्प्यात आली आहे, असे पळसे यांनी सांगितले. दरम्यान, समारंभाच्या आणि ग्रंथ महोत्सवाच्या ठिकाणी मंडप उभारणीचे काम मंगळवारी वेगाने सुरु होते. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

### आज ग्रंथमहोत्सव, उद्या दिंडी

ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन आज, बुधवारी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. या महोत्सवात ३० हून अधिक प्रकाशक, विक्रेते सहभागी होणार आहेत. त्यानंतर राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित 'गीतबहार' हा जुन्या मराठी-हिंदी गीतांचा कार्यक्रम होईल. 'शिरीयल फिरीयल' ही लघुनाटिका होणार आहे. ग्रंथदिंडी गुरुवारी (दि. ६) सकाळी साडेसात वाजता कमला कॉलेज येथून सुरु होईल. जनता बझार, राजारामपुरी मेन रोड, सायबर चौकामार्गे ही ग्रंथदिंडी विद्यापीठात येईल. दिंडीमध्ये सामाजिक विषयांवर पथनाट्य सादरीकरण विद्यार्थी करणार आहेत.

# उन्हाळी सत्रातील परीक्षा २७ मार्चपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ दि. २७ मार्चपासून होणार आहे. त्यासाठी अर्ज करण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाली आहे. या सत्रामध्ये विविध अभ्यासक्रमांच्या एकूण ६८० परीक्षा होणार आहे. त्याच्या तारखा परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून सोमवारी जाहीर करण्यात आल्या आहेत. बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बी. व्होक., बीसीए., बी. ए. बी. एड्., एम. एस्सी., एमसीए., एम. ए., डिप्लोमा, अशा विविध ६८० अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सोमवारपासून सुरु झाली. विनाविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. १७ फेब्रुवारी, विलंब शुल्कासह २४, तर अतिविलंब शुल्कासह २९ फेब्रुवारीपर्यंत आहे. प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांतर्फे घेण्यात येते. त्याबाबतची कार्यवाही महाविद्यालयांनी करावयाची आहे. जूनपर्यंत या परीक्षा चालणार आहेत.

- उद्घाटन : शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन.
स्थळ : लोककला केंद्रासमोर.
वेळ : सकाळी १0.३0 वा.
- उद्घाटन : शिवाजी विद्यापीठ परिसरातील अभ्यागत भोजन कक्षाचा उद्घाटन सोहळा. हस्ते : कुलगुरु देवानंद शिंदे.
स्थळ : मानव्यशास्त्र इमारतीसमोर, शिवाजी विद्यापीठ.
वेळ : सकाळी ११.१५ वा.

ग्रंथमहोत्सव : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त सोहळ्यांतर्गत ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन, हस्तेः कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, गीतबहार कार्यक्रम, स्थळ : राजमाता जिजाऊ सभागृह, वेळ : सकाळी १० ते ११ : ३० वा.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 05-02-2020

पुण्यनगरी

# दीक्षांत समारंभाच्या तयारीला वेग



कोल्हापूर : दीक्षांत समारंभानिमित्त उभारण्यात येत असलेला मंडप.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ गुरुवार, दि. ६ रोजी होत आहे. समारंभाला कुलपती भगतसिंह कोश्यारी यांची उपस्थिती असल्याने प्रशासनातर्फे जोरदार तयारी सुरू आहे.

मुख्य इमारतीस विविध दालनांची साफसफाई तसेच रंगरंगोटी, ग्रंथप्रदर्शनासाठी उभारण्यात येणारे स्टॉल्स, दीक्षांत मिरवणूक मार्गावर उभारण्यात येणारा मंडप, नीटनेटकेपणाने सजवली जाणारी बाग, असे चित्र शिवाजी विद्यापीठात दिसत आहे.

दीक्षांत समारंभानिमित्त आयोजित ग्रंथप्रदर्शनात अनेक दुर्मीळ पुस्तके उपलब्ध होणार असून, ती पुस्तकप्रेमींसाठी पर्वणी ठरणार आहे. बुधवार दि. ५ रोजी सायंकाळी सादर होणाऱ्या गीतबहार आणि 'शिरीयल फिरीयल' कार्यक्रमांची तालीम संगित व नाट्यशास्त्र विभागातर्फे सुरू आहे. दीक्षांत समारंभानिमित्त मुख्य इमारतीवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार असून, त्याची तयारीही सुरू आहे.



'सायबर'मध्ये आयोजित आनंद ग्रंथोत्सव उद्घाटनप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाचे पदार्थ विज्ञान विभागप्रमुख डॉ. पी. एस.पाटील. यावेळी डावीकडून विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे, डॉ. बाबू झकेरिया, डी. टी. विचारे, आदी.

# 'नॅनो टेक्नॉलॉजीमुळे जगणे सुसह्य'

कोल्हापूर : 'आधुनिक युगात प्रत्येक माणसाला कमी मोबदल्यात आधुनिक सुखसुविधांची गरज भासत आहे. या अपेक्षित गोष्टी नॅनो टेक्नॉलॉजीच्या वापरामुळे शक्य होतील. किंबहुना, नॅनो टेक्नॉलॉजीमुळे जगणे सुसह्य झाले आहे', असे मत डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

सायबरचे संस्थापक दिवंगत डॉ. ए. डी. शिंदे यांच्या १० पुण्यस्मरणनिमित्त आयोजित आनंद ग्रंथोत्सवाचे उद्घाटन पाटील यांच्याहस्ते झाले. त्यावेळी नॅनो टेक्नॉलॉजी या विषयावर ते बोलत होते. संस्थेचे विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे यांच्या अध्यक्षस्थानी होते.

पाटील म्हणाले, 'सध्या जगभरात, विशेष करून विकसित देशांत मोठ्या प्रमाणात नॅनो टेक्नॉलॉजीवर आधारित संशोधनावर मोठ्या प्रमाणात खर्च आणि गुंतवणूक केली जात आहे. शिवाजी विद्यापीठातही मोठ्या प्रमाणात काम सुरू आहे. एकंदरीतच मानवी समाज अधिक सुखी होईल, या दृष्टीने तंत्रज्ञानची वाटचाल सुरू आहे.'

प्रास्ताविक आणि पाहुण्याचे ओळख डॉ. कृष्णात चौगले यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. सुरेश आपटे यांनी केले. डॉ. अजय शिंदे यांनी आभार मानले.

# माजी विद्यार्थी मेळावा शनिवारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागात ८ फेब्रुवारीला माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन केले आहे. सकाळी अकरा विभागाच्या सभागृहात हा मेळावा होणार आहे.

अभ्यासक्रमाबाबत सूचना तसेच या विद्यार्थ्यांचे भावी वाटचालीत योगदान, शिक्षक व विद्यार्थी यांच्या एकमेकांकडून अपेक्षा जाणून घेण्यासाठी मेळावा आयोजित केला आहे. विभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

मटा एज्युकेशन

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 05-02-2020
पुण्यनगरी

# मुलींबद्दल मानसिकता बदला

## शिवाजी विद्यापीठातील मेधाविनी नामजोशी यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** मुलींवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रश्न संपवायचे असतील, तर मुलींबद्दल समाजात असलेली मानसिकता बदलणे काळाची गरज आहे. कायदे करून मानसिकता बदलत नाही, असे प्रतिपादन मुंबईतील बालसमुपदेशक मेधाविनी नामजोशी यांनी केले. त्या शिवाजी विद्यापीठात बेटी बचाओ अभियानांतर्गत आयोजित गर्ल चाईल्ड इन महाराष्ट्र इशुस अँड प्रोस्पेक्टस् या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या.

मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात नामजोशी म्हणाल्या, जेव्हा आपण मूल किंवा बालक म्हणतो तेव्हा आपल्या डोळ्यासमोर मुलाचे चित्र येते, मुलगीचे येत नाही. ही सामाजिक मानसिकता आहे. जोपर्यंत मूल किंवा बालक म्हटल्यावर मुलगीचे चित्र समोर येत नाही, तोपर्यंत समाजात मुलींचे प्रश्न कायम राहतील. आतापर्यंत गर्ल चाईल्डसारखे बॉय चाईल्डचे कार्यक्रम कधी घेतले आहेत का, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला



कोल्हापूर : चर्चा सत्रामध्ये बोलताना मेधाविनी नामजोशी.

पाहिजे. सध्याच्या काळात मुली या बालपण अनुभवतात की, मुलीचे जीवन म्हणून अनुभवतात हे महत्त्वाचे आहे. कारण सध्या गर्लहुड संकल्पना विकसित होत आहे. स्त्री आणि पुरुष असण्याला जेव्हा तत्त्वजोडली जातात तिथेच समस्यांना सुरुवात होते. मुलींना बालपणापासूनच स्वातंत्र्य दिले जात नाही. स्वतःच्या सुरक्षिततेच्या चिंतेने मुली स्वतःला कधीही मोकळे करत नाहीत. त्यामुळे समाजातील मुलींवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी समाजात असलेली मानसिकता बदलण्याची गरज आहे.

या चर्चासत्रास बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

● **ग्रंथ महोत्सव :** शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीन्क्षात समारंभानिमित्त ग्रंथ महोत्सव स्टॉल उद्‌घाटन, स्थळ : राजमाता जिजाऊसाहेब सभागृह, दिन्क्षात सभा मंडपजवळ, वेळ : सकाळी १० वाजता.

# विद्यापीठात शनिवारी वाणिज्य, व्यवस्थापन विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये शनिवार (दि. ८) रोजी सकाळी ११ वाजता माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. माजी विद्यार्थ्यांची वाटचाल, विद्यापीठ व विभागामध्ये झालेले बदल विद्यार्थ्यांना अवगत करणे, नवागत विद्यार्थ्यांची सुसंवाद साधणे, अभ्यासक्रमाबाबत सूचना तसेच या विद्यार्थ्यांचे भावी वाटचालीत योगदान, वर्तमान शिक्षक व विद्यार्थ्यांबद्दलच्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी मेळावा होत आहे. याप्रसंगी अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 05-02-2020

पुण्यनगरी

# दीक्षांत समारंभासाठी विशेष बससेवा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापिठाच्या दीक्षांत सोहळ्यासाठी दि. ६ रोजी के.एम.टी. उपक्रमामार्फत विशेष बससेवा देण्यात येणार आहे. शुगर मिल व शिवाजी चौक येथून नियमित बसेस सकाळी ६.३० वाजल्यापासून सुरू रहाणार आहेत. या बससेवेचा मार्ग छ.शिवाजी महाराज चौक, सायन्स कॉलेज, विनायक बंगला, रेल्वे फाटक, राजारामपुरी, सम्राटनगर, सायबर, शिवाजी विद्यापीठ असा आहे. तसेच साळोखेनगर, आपटेनगर, कागल, कणेरी मठ या बसेस शिवाजी विद्यापीठमार्गे धांवतील. बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रेल्वे फाटक नं. १ येथून सकाळी ७ वाजल्यापासून प्रत्येक १० मिनिटांच्या अंतराने विशेष बससेवा सुरू राहील.

● **ग्रंथमहोत्सव :** शिवाजी विद्यापीठातर्फे बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रातर्फे ग्रंथमहोत्सव, प्रमुख उपस्थित : कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, स्थळ : राजमाता जिजाऊसाहेब सभागृह, दीक्षांत सभा मंडपाजवळ, वेळ : सकाळी दहा वाजता, गीत बहार : संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा सांस्कृतिक कार्यक्रम,सकाळी साडेअकरा वाजता



# वाणिज्य व व्यवस्थापन विभागात शनिवारी मेळावा

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये शनिवारी (ता. ८) सकाळी अकरा वाजता माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केले आहे. माजी विद्यार्थ्यांची आजवरची वाटचाल तसेच गेल्या काही कालावधीत विद्यापीठ व विभागामध्ये झालेले बदल अवगत करणे, नवागत विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधणे, अभ्यासक्रमाबाबत सूचना तसेच या विद्यार्थ्यांचे भावी वाटचालीत योगदान, सध्याचे शिक्षक व विद्यार्थ्यांबद्दलच्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी हा मेळावा आयोजित केला आहे. अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

**भोजनकक्षाचे आज उद्‌घाटन**

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ परिसरात नव्याने उभारलेल्या अभ्यागत भोजनकक्षाचे उद्या (बुधवारी) उद्‌घाटन होणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी सव्वाअकरा वाजता हा कार्यक्रम होईल. मानव्यशास्त्र इमारतीसमोर हा कक्ष उभारला आहे.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 05-02-2020

तरुण भारत

# वाणिज्य व व्यवस्थापन विभागात शनिवारी माजी विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये शनिवार दि. ८ रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. आजवरची वाटचाल तसेच गेल्या काही कालावधीत विद्यापीठ व विभागामध्ये झालेले बदल अवगत करणे, नवागत विद्यार्थ्यांची सुसंवाद साधणे, अभ्यासक्रमाबाबत सूचना तसेच या विद्यार्थ्यांचे भावी वाटचालीत योगदान, वर्तमान शिक्षक व विद्यार्थ्यांबदलच्या अपेक्षा जाणून घेणे यासाठी हा मेळावा आहे. माजी विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

■ **उद्घाटन :** शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्याअंतर्गत ग्रंथमहोत्सव उद्घाटन व गीतबहार कार्यक्रम. स्थळ : राजमाता जिजाऊसाहेब सभागृह. वेळ : सकाळी १० वाजता.